|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/३३५/२०२२ दिनांक: ११/११/२०२२

अत्यंत महत्वाचे

*(कालमर्यादा दि. 19/11/2022 पर्यंत)*

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/शिक्षक तथा
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक/शिक्षक ......

**विषय:- संलग्नता विभागाच्या ऑनलाईन प्रणाली (OAASIS) मार्फत शिक्षकांची माहिती भरणेबाबत/यापूर्वी भरलेली माहिती अद्ययावत करणेबाबत......**

महोदय/महोदया,

वरील विषयान्वये मा.प्र-कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे कार्यालयीन कामकाज संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने सुरु असून सदर प्रक्रियेव्दारे संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील कार्यरत असणा-या संबंधित शिक्षकांची (मा.प्राचार्य/मा.संचालक यांचेसह) माहिती ऑनलाईन प्रणालीव्दारे महाविद्यालयांकडून वेळोवेळी भरुन घेण्यात येवून अद्ययावत करुन घेण्यांत येत असते.

याबाबतीत नमूद करण्यात येते की, महाविद्यालयातील/परिसंस्थांतील प्राध्यापकांची यांची ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती सादर करतांना सदर 415(1) नुसार प्राध्यापकाचे नेमणूकीचे आदेश क्रमांक, दिनांक, अध्यापन करीत असलेले विषय, सेवानिवृत्तीचा दिनांक आणि कायमस्वरुपी कार्यान्वित असलेला मोबाईल क्रमांक याबाबी नमूद करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबी हया महाविद्यालयांच्या OAASIS च्या Login ला जावून अद्ययावत करावयाच्या आहेत. तरी वरील माहिती भरण्यासाठी खालील दिलेल्या प्रक्रियेचा अवलंब करावा.

01) Connect to https://online kbcnmu.org.in website.
02) Click on **Affiliation Section**
03) Entry your College **Login ID** and **Passward** in sign in **Section** and **Click** on **Login** Button.
04) Click on **Teaching Staff** Section.
05) Re-enter Passward and Click on **Continue** Button.
06) Click on Manage **Teaching Staff Link**.
07) To Add/Register New Teaching Staff joined in your college click on the link **"Add New"** .
08) Kindly note that, if the staff has been transferred in from some other college of KBCNMU the simply send his/her OAASIS registered Login ID and your college ID for transferring entire profile of that staff to your college. Do not re-register the same staff again.
09) Send mail to support@onlinekbcnmu.org.in for such transfer cases.
10) To update details of already registered staff used the link **"Manage Registered Staff".**
11) For transfer cases click on the link **"Manage Registered Staff"** and the click on X link in the colum **"Remove from College List (Transfer Cases)".**
12) For retired staff cases click on the link **"Manage Registered Staff"** and click on X link in the column **"Mark Retired Staff"**
13) माहिती अपडेट केल्यानंतर Submit to Univrsity करावे.

**(कृ.मा.प.)**

तसेच संवर्ग नमूद करण्यासाठी प्रत्येक प्राध्यापकाने आपल्या वैयक्तिक OAASIS Account वर जावून संवर्गासह इतर माहिती अद्ययावत करावी.

उपरोक्त माहिती ही संलग्नता विभागामार्फत वेळोवेळी नियुक्त केल्या जाणाऱ्या समित्यांच्या कामकाजासाठी आवश्यक आहे. तरी सदर माहिती ही अत्यंत अचूक व कालमर्यादेत सादर करणे आवश्यक आहे.

तरी वरील माहिती भरणेसाठी **महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेकरिता आणि शिक्षकांकरिता दिनांक 11/11/2022 ते 19/11/2022 या कालावधीत** ऑनलाईन प्रणालीव्दारे Link सुरु करण्यांत आलेली आहे. **ऑनलाईन प्रणालीव्दारे यापूर्वी भरलेला संपूर्ण डेटा हा ऑनलाईन स्क्रिनवर उपलब्ध असून त्यातील माहिती अद्ययावत करणेसाठी आपणांस त्या-त्या स्क्रिनवरील त्या-त्या विंडोसमोर Edit/Delete ची सोय उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. संबंधितांना त्याप्रमाणे सदर माहिती आवश्यकतेनुसार अद्ययावत करता येईल**. सोबत आवश्यक त्या guidelines देण्यांत आलेल्या असून online help देखील उपलब्ध केलेली आहे. मात्र **सदरची Online Link दिनांक 19/11/2022 रोजी सायंकाळी 5.00 वाजता बंद होईल, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी**.माहिती भरणेसाठी आवश्यकता भासल्यास **8828996668 / 8828996669** हया क्रमांकावर संपर्क करावा.

सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमधील शिक्षकांच्या निदर्शनासआणून द्यावे, तसेच उपरोक्त माहिती अचूक भरणेबाबत आपल्या स्तरावरुन सूचना द्याव्यात तसेच माहिती अपूर्ण किंवा चूकीची नमूद केल्यास त्यास मा.प्राचार्य/संचालक तसेच संबंधित शिक्षक जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घेवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**म.कळावे,**

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

**प्रत:-**

01) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
02) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

**प्रत माहितीस्तव :-**

01) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
02) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव
03) मा.उपकुलसचिव, संशोधन विभाग, कबचौउमवि,जळगाव